# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in

===============================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १५०२ दि. ०८/०६/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# मुंबई शहर बेटावरील २१ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक

## म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे इमारतींचे पावसाळापूर्व सर्वेक्षण पूर्ण ; धोकादायक इमारतींची यादी जाहीर

मुंबई, दि. ८ जून,२०२१ : म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे नियमित पावसाळापूर्व सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून २१ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक आढळून आल्या आहेत. या २१ इमारतींमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक म्हणून घोषित केलेल्या १० इमारतींचा समावेश आहे, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

म्हाडा मुख्यालयातून पत्रकारांशी बोलताना श्री. घोसाळकर यांनी सांगितले की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत १४ हजार ७५५ उपकर प्राप्त इमारती जुन्या आणि जीर्ण अवस्थेत आहेत. दरवर्षी या इमारतींचे पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षण केले जाते. त्यानुसार मे महिन्या अखेरपर्यंत ०९ हजार ४८ उपकरप्राप्त इमारतींचे (६८ टक्के) सर्वेक्षण करण्यात आले होते. मात्र आता हे सर्वेक्षण पूर्ण झाले असून २१ इमारती अतिधोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे. या अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतींतील भाडेकरू/रहिवाशांची जीवित तथा वित्तहानी टाळण्यासाठी मंडळातर्फे आपत्ती निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली आहे, असेही श्री. घोसाळकर यांनी सांगितले. मंडळाच्या चारही झोनमध्ये ठेकेदार नियुक्त करण्यात आले असून इमारतीच्या धोक्याची लक्षणे तथा इमारत कोसळल्याचे मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदारामार्फत तात्काळ आपत्ती निवारणाबाबत कार्यवाही केली जाणार आहे. तसेच नियंत्रण कक्षातील अधिकारी तात्काळ जागेवर जाऊन इमारतीची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या २१ इमारतींची यादी पुढीलप्रमाणे**

१) इमारत क्रमांक १४४,एमजीरोड,अ- ११६३ (मागील वर्षीच्या यादीतील)
२) इमारत क्रमांक १३३ बी बाबुलाल टँक रोड, बेग मोहम्मद चाल ,
३) इमारत क्रमांक ५४ उमरखाडी,१ ली गल्ली छत्री हाऊस ,
४) इमारत क्रमांक १०१-१११, बारा इमारत रोड, (मागील वर्षीच्या यादीतील)
५) इमारत क्रमांक ७४ निजाम स्ट्रीट, (मागील वर्षीच्या यादीतील)

६) इमारत क्रमांक १२३,किका स्ट्रीट (मागील वर्षीच्या यादीतील)
७) इमारत क्रमांक १६६ डी मुंबादेवी रोड , (मागील वर्षीच्या यादीतील)
८) इमारत क्रमांक २-४ ए ,२री भोईवाडा लेन ,
९) इमारत क्रमांक ४२ मस्जिद स्ट्रीट
१०) इमारत क्रमांक १४ भंडारी स्ट्रीट (मागील वर्षीच्या यादीतील)
११) इमारत क्रमांक ६४ -६४ ए भंडारीस्ट्रीट , मुंबई
१२) इमारत क्रमांक १-३-५ संत सेना महाराज मार्ग
१३) इमारत क्रमांक ३ सोनापूर २ री क्रॉस लेन
१४) इमारत क्रमांक २-४ सोराबजी संतुक लेन ,
१५) इमारत क्रमांक ३८७-३९१,बदाम वाडी व्ही पी रोड (मागील वर्षीच्या यादीतील)
१६) इमारत क्रमांक ३९१ डी बदाम वाडी,व्ही पी रोड (मागील वर्षीच्या यादीतील)
१७) इमारत क्रमांक २७३ -२८१ फॉकलँड रोड , डी, २२९९- २३०१ (मागील वर्षीच्या यादीतील)
१८) इमारत क्रमांक १, खेतवाडी १२ वी गल्ली(डी ) २०४९ (मागील वर्षीच्या यादीतील)
१९) इमारत क्रमांक ३१-सी व ३३- ए रांगणेकर मार्ग व १९ पुरंदरे मार्ग गिरगाव चौपाटी
२०) इमारत क्रमांक १०४-१०६ मेघजी बिल्डिंग अ, ब व क विंग , शिवदास चापसी मार्ग
२१) इमारत क्रमांक १५-१९ के . के. मार्ग व१-३ पायस स्ट्रीट

या अतिधोकादायक इमारतींमध्ये ४६० निवासी व २५७ अनिवासी असे एकूण ७१७ रहिवासी / भाडेकरू आहेत. यापैकी १९३ निवासी भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची स्वतःची इतरत्र पर्यायी व्यवस्था केली आहे. आतापर्यंत २० निवासी भाडेकरू /रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले आहे. उर्वरित २४७ निवासी भाडेकरू / रहिवाशांना निष्कासनाच्या सूचना देऊन गाळे खाली करून घेण्याची कार्यवाहीसुरू आहे. सदर अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशी/ भाडेकरू यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या सूचना देण्याची व त्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री. घोसाळकर यांनी अतिधोकादायक इमारतींतील भाडेकरू /रहिवाशांना मंडळातर्फे आवाहन केले आहे की त्यांनी मंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार इमारती रिक्त करण्याकामी सहकार्य करावे व सुरक्षेकरिता मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे जेणेकरून अपघातामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळता येईल. तसेच मंडळाचा नियंत्रण कक्ष अहोरात्र कार्यरत असल्याने इमारतीमध्ये कोणतीही धोक्याची लक्षणे तथा अपघात घडल्यास तात्काळ नियंत्रण कक्षास सूचित करण्यात यावे.

**मंडळाचा नियंत्रण कक्ष**

रजनी महल,पहिला मजला, ८९-९५, ताडदेव रोड, ताडदेव, मुंबई- ४०००३४. दूरध्वनी क्रमांक - २३५३६९४५, २३५१७४२३. भ्रमणध्वनी क्रमांक - ९१६७५५२१११२.

**मुंबई महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष**

पालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई. दूरध्वनी क्रमांक २२६९४७२५/२७

------- *********-------

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,

## जाहीर निवेदन

म्हाडा MHADA

# मुंबई शहर बेटावरील अतिधोकादायक इमारती

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे **सन २०२१** मध्ये नियमित व पावसाळापूर्व सर्वेक्षण करण्यात आले असून या सर्वेक्षणात खालील इमारती अतिधोकादायक आढळून आल्या आहेत.

| क्र. | विभाग | कार्यालयाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | इमारतीचे नाव/ वर्णन |
|---|---|---|---|
| १. | अ | **कार्यकारी अभियंता-अ विभाग**- कफ परेड, कुलाबा संक्रमण शिबिर, मुंबई ५. दूरध्वनी क्र. २२१८७७८५, ई-मेल: **rreeamhada@gmail.com** | ◆ इमारत क्र. १४४ एम. जी. रोड, अ-११६३ |
| २. | बी-२ | **कार्यकारी अभियंता-बी-२ विभाग**- महानगरपालिका, बी विभाग इमारत, बबुला टँक रोड, क्रॉस लेन, मुंबई ९. दूरध्वनी क्र. २३७७४९१०, ई-मेल: **executiveengrbward@gmail.com** | इमारत क्र. १३३ बी, बाबुला टँक रोड, बेग मोहम्मद चाळ, उपकर क्र. बी-३६१६(१) |
| ३. | | | इमारत क्र. ५४, उमरखाडी, १ ली गल्ली, छत्री हाऊस, उपकर क्र. बी-३५१७ |
| ४. | सी-१ | **कार्यकारी अभियंता-सी-१ विभाग**<br>इमारत क्र. ६६, तळमजला, दादरकर कंपाऊंड, पेट्रोलपंपजवळ, ताडदेव, मुंबई ३४. दूरध्वनी क्र. २३५१२९०६<br>ई-मेल: **rreec1mhada@gmail.com** | ◆ इमारत क्र. १०१-१११, बारा इमारत रोड |
| ५. | | | ◆ इमारत क्र. ७४, निझाम स्ट्रीट |
| ६. | | | ◆ इमारत क्र. १२३, किका स्ट्रीट |
| ७. | | | ◆ इमारत क्र. १६६डी, मुंबादेवी रोड |
| ८. | | | इमारत क्र. २-४ए, २री भोईवाडा लेन |
| ९. | | | इमारत क्र. ४२, मस्जिद स्ट्रीट |
| १०. | सी-३ | **कार्यकारी अभियंता-सी-३ विभाग**<br>१०-१२, दुसरा मजला, रोपा लेन, चंदनवाडी, मरीन लाइन्स, मुंबई ४००००२, दूरध्वनी क्र. २२०५४२३५<br>ई-मेल: **rreec3mhada@gmail.com** | ◆ इमारत क्र. १४, भंडारी स्ट्रीट |
| ११. | | | इमारत क्र. ६४-६४ए, भंडारी स्ट्रीट, मुंबई |
| १२. | | | इमारत क्र. १-३-५, संत सेना महाराज मार्ग |
| १३. | | | इमारत क्र. ३, सोनापूर, २री क्रॉस लेन |
| १४. | | | इमारत क्र. २-४, सोराबजी संतुक लेन, मुंबई-०२ |
| १५. | डी-१ | **कार्यकारी अभियंता-डी-१ विभाग**<br>८९-९५, रजनी महल बिल्डिंग, १ला मजला, ए. सी. मार्केटसमोर, ताडदेव, मुंबई ३४, दूरध्वनी क्र. २३५३१३६१, ईमेल: **rreed1mhada@gmail.com** | ◆ इमारत क्र. ३८७-३९१, बदाम वाडी, व्ही. पी. रोड |
| १६. | | | ◆ इमारत क्र. ३९१डी, बदामवाडी, व्ही. पी. रोड |
| १७. | डी-२ | **कार्यकारी अभियंता-डी-२ विभाग**<br>८९-९५, रजनी महल बिल्डिंग, १ला मजला, ए. सी. मार्केटसमोर, ताडदेव, मुंबई ३४, दूरध्वनी क्र. २३५३३०६०, ईमेल: **eembrrbd2@gmail.com** | ◆ इमारत क्र. २७३-२८१, फॉकलँड रोड, (डी-२२९९-२३०१) |
| १८. | | | ◆ इमारत क्र. १, खेतवाडी, १२ वी गल्ली (डी-२०४९) |
| १९. | डी-३ | **कार्यकारी अभियंता-डी-३ विभाग**<br>८९-९५, रजनी महल बिल्डिंग, १ला मजला, ए. सी. मार्केटसमोर, ताडदेव, मुंबई ३४, दूरध्वनी क्र. २३५३१३६१, ईमेल: **rreed3mhada@gmail.com** | इमारत क्र. ३१सी व ३३ए, आर. रांगणेकर मार्ग व १९ पुरंदरे मार्ग, गिरगांव चौपाटी, मुंबई, डी-२४४५(९) |
| २०. | ई-१ | **कार्यकारी अभियंता-ई-१ विभाग**<br>इमारत क्र. २४, तळमजला, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई ३३, दूरध्वनी क्र. २४७०५५८१<br>ई-मेल: **rreee1mhada@gmail.com** | इमारत क्र. १०४-१०६, मेघजी बिल्डिंग, अ, ब व क विंग, शिवदास चापसी मार्ग, मुंबई-९ |
| २१ | ई-२ | **कार्यकारी अभियंता-ई-१ विभाग**<br>इमारत क्र. २४, तळमजला, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई ३३, दूरध्वनी क्र. २४७०५५८२<br>ई-मेल: **rreee2mhada@gmail.com** | इमारत क्र. १५-१९, के. के. मार्ग व १-३ पायस स्ट्रीट |

**टीप : ◆ मागील वर्षी ( सन २०२० च्या पावसाळापूर्व अतिधोकादायक म्हणून घोषित) अतिधोकादायक घोषित केलेल्या इमारती.**

सदर २१ अतिधोकादायक आढळलेल्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक जाहीर केलेल्या १० इमारतींचा समावेश आहे. या अतिधोकादायक इमारतींमध्ये ४६० निवासी + २५७ अनिवासी असे एकूण ७१७ रहिवाशी / भाडेकरू आहेत. १९३ निवासी भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची स्वतःची इतरत्र पर्यायी व्यवस्था केली आहे. आतापर्यंत २० रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित केलेले आहे. उर्वरित भाडेकरू / रहिवाशांना निष्कासनाच्या सूचना देऊन गाळे खाली करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित २४७ निवासी भाडेकरू / रहिवाशांची संक्रमण शिबिरात व्यवस्था करावी लागेल. सदर अतिधोकादायक इमारतीमधील राहिवाशी / भाडेकरू यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटिसा देण्यात येतील व त्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तरी अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी यांना जाहीर आव्हान करण्यात येते की, त्यांनी मंडळाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व अतिधोकादायक इमारती आवश्यकतेनुसार खाली कराव्यात व मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे जेणेकरून अपघात होऊन होणारी जीवित व वित्तहानी टाळता येईल.

## मंडळातर्फे आवाहन

भाडेकरू / रहिवाशांच्या जीविताच्या तथा वित्ताच्या रक्षणार्थ अतिधोकादायक ठरविलेल्या उपरोक्त तसेच मुंबई शहर बेटावरील इतर जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतीमधील रहिवाशांनी पुढील सूचनांचे पालन करून मंडळातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

१. इमारतीच्या अतिधोकादायक भागाचा वापर त्वरित थांबवावा. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी गाळे रिकामे करण्याच्या नोटीस बजावल्यानंतर गाळे त्वरित रिकामे करावे, धोकादायक इमारतीत राहू नये.
२. संक्रमण शिबिरात निवासस्थान मिळण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात अर्ज करावा जेणेकरून पर्यायी निवासस्थान उपलब्ध करून देण्यात येईल.
३. सुरक्षिततेचा उपाय म्हणून करण्यात येणाऱ्या कामांत, जसे इमारतीचा धोकादायक भाग पाडणे, इमारतीस टेकू लावणे, इमारतीची दुरुस्ती करणे इत्यादी कामासाठी मंडळास सहकार्य करावे.
४. इमारतींना तडे जाणे, माती पडू लागणे, इमारतींना पूर्वी असलेल्या भेगा रुंद होणे, इमारतीचा कुठलाही भाग खचणे, जमिनीपासून भिंत अलग होणे अशी लक्षणे निदर्शनास आल्यास इमारतीस होणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन त्याबाबतची किंवा इमारतीस लहान वा मोठ्या स्वरूपाचा अपघात झाला असल्यास त्याबाबत मंडळाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांना तसेच महापालिकेच्या संबंधित विभाग अधिकारी यांना व अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना, पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती द्यावी. सदर माहिती मंडळाच्या व महापालिकेच्या नियंत्रण कक्षासदेखील देण्यात यावी.

## नियंत्रण कक्ष :-

**(अ) मंडळाचा नियंत्रण कक्ष :**

रजनी महल, पहिला मजला, ८९-९५, ताडदेव रोड, ताडदेव, मुंबई-४०००३४.
दूरध्वनी क्रमांक- २३५३६९४५/२३५१७४२३
भ्रमणध्वनी क्रमांक- ९३२१६३७६९९.

**(ब) मुंबई महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष**

पालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई-०१
दूरध्वनी क्र. : २२६९४७२५/२७.

सही/-
**(अरुण डोंगरे),**
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

**म्हाडा- गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**
सीपीआरओ/ए/२४७